# जिल्हा परिषद,गडचिरोली
## बांधकाम विभाग

दुरध्वनी क्रं.-07132-222309 Email:-zpgadchiroli.ee@gmail.com


**क्रमांक**/जिपग/बांध/**आस्था**-06/ 2239 /2024, दिनांक :- 10 / 06 /2024

पदभरती-2023

**तात्काळ**

**प्रति,**

--------------------------------------------

--------------------------------------------

--------------------------------------------

**विषय :- कनिष्ठ अभियंता पदाकरीता सरळसेवा पदभरती-2023.**
**दिनांक :- 18 / 06 /2024 रोजी दस्ताऐवज पडताळणीकरीता उपस्थित राहणेबाबत.**

*****

वरिल विषयान्वये महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक दिनांक 15 मे, 2023 मधील निर्देशानुसार बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, गडचिरोली अंतर्गत मंजुर **कनिष्ठ अभियंता** या पदाकरीता सरळसेवा पदभरती 2023 नुसार जाहीरात प्रसिद्ध करुन आय.बी.पी.एस. कंपनीकडुन ऑनलाईन पद्धतीने दिनांक 20/11/2023 रोजी परिक्षा घेण्यांत आलेल्या आहेत.

आय.बी.पी.एस. कंपनीकडुन सदर परिक्षेचा निकाल घोषित करण्यात आलेला असुन, प्राप्त गुणवत्ता यादीमध्ये आपले नाव समाविष्ठ असल्याने **दिनांक** :- 18/06/2024 रोजी सकाळी 11.00 वाजता जाहीरातीच्या अनुषंगाने, आपण ऑनलाईन सादर केलेल्या माहितीची तपासणी करण्याकरीता मुळ कागदपत्रे व त्यांची दोन सांक्षाकित प्रतीसह **विर बाबुराव सेडमाके सभागृह, जिल्हा परिषद, गडचिरोली** येथे न चुकता उपस्थित राहावे. उक्त दिनांकास कागदपत्रे पडताळणी करीता गैरहजर राहणाऱ्या उमेदवारांना निवड प्रक्रियेसंबंधात कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही किंवा हक्क सांगता येणार नाही, याची नोंद घेण्यात यावी.

उमेदवारांची ओळख / कागदपत्रे / प्रमाणपत्रे पडताळणी केल्यानंतर गुणवत्तेनुसार /पात्रतेनुसार अंतिम निवड सुची व प्रतिक्षा यादी प्रसिद्ध करण्यांत येईल, याची नोंद घ्यावी.

(**सोबत** :-कागदपत्रे/प्रमाणपत्र **यादी**)

(आयुषी सिंह, भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद, गडचिरोली**

**प्रतिलिपी** :-

1. मा.अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी, गडचिरोली यांना माहीतीस सविनय सादर.
2. सदस्य सचिव, जिल्हा निवड समिती तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.), जिल्हा परिषद, गडचिरोली यांना माहितीस तथा उचित कार्यवाहीस अग्रेषित.
3. सदस्य, जिल्हा निवड समिती तथा कार्यकारी अभियंता (बांध), जिल्हा परिषद, गडचिरोली यांना आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.

(आयुषी सिंह, भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद, गडचिरोली**

## जिल्हा परिषद, सरळसेवा भरती प्रक्रिया 2023 अंतर्गत उमेदवारांनी कागदपत्रे पडताळणीस घेऊन यावयाची कागदपत्रे

| अं.क्र. | कागदपत्रे / प्रमाणपत्रे |
|---|---|
| 1 | संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या अर्जाची प्रिंट व परिक्षाशुल्क **भरणा** केल्याची पावती. |
| 2 | अर्जदाराची माहिती बरोबर असल्याचे स्वंयघोषणापत्र |
| 3 | शैक्षणिक अर्हतेबाबत सर्व **मुळ** शैक्षणिक कागदपत्रे. |
| 4 | **वयाचा पुरावा (जन्म दाखला/ शाळा** सोडल्याचे **मुळ प्रमाणपत्र** ) |
| 5 | रहिवासी **प्रमाणपत्र** |
| 6 | राखीव प्रवर्गा संदर्भात **पुरावा** (ज्या उमेदवारांनी सामाजिक **आरक्षणातून** अर्ज **दाखल** केला आहे, **त्या** उमेदवांरासाठी **लागू** ) |
| 7 | राखीव प्रवर्गा संदर्भात **पुरावा** (ज्या उमेदवारांनी **समांतर** आरक्षणातून अर्ज **दाखल** केला आहे, **त्या** उमेदवारांसाठी **लागू** ) **खेळाडू / माजी सैनिक / प्रकल्प ग्रस्त / अनाथ / अंशकालीन कर्मचारी** |
| 8 | **नॉन** क्रिमीलेअर **प्रमाणपत्र** ( अर्ज सादर केल्याच्या दिनांकास वैध असणारे ) |
| 9 | दिव्यांगाचे ऑनलाईन **मुळ प्रमाणपत्र पुरावा** (ज्या उमेदवारांनी दिव्यांग **मधुन** अर्ज **दाखल** केला आहे, **त्या** उमेदवारांसाठी **लागू**) |
| 10 | **महाराष्ट्र** कर्नाटक सीमा भागातील **महाराष्ट्र** शासनाने **दावा** सांगितलेल्या 865 गावामधील मराठी **भाषीक उमेदवारांना सक्षम** प्राधिकाऱ्यांचा **विहित नमुन्यातील दाखला.** |
| 11 | **नावात बदल असल्यास महाराष्ट्र** शासनाचे **मुळ** राजपत्र किंवा मॅरेज सर्टिफिकेट **प्रमाणपत्र** (विवाहित महिलांकरीता) |
| 12 | **लहान कुटुंबाचे शपथपत्र** विहीत **नमुन्यात** |
| 13 | **संगणक** अर्हता **प्रमाणपत्र** |
| 14 | ओळखपत्र **मुळ** ( **आधार** कार्ड/ **वाहन परवाना**/राज्य निवडणुक आयोगाचे ओळखपत्र /पासपोर्ट / **राष्ट्रीयकृत बँकेचे खाते पुस्तक / पॅन कार्ड** / कॉलेज मधील **आयकार्ड ) पैकी एक आणावे.** नावात **बदल असु नये.** |
| 15 | **उक्त पदाच्या** अनुषंगाने जाहीरातीत **नमुद** सेवा प्रवेश नियम, अटी **व** शर्ती **नुसार आवश्यक कागदपत्र.** |

(आयुषी सिंह, भा.प्र.से.)
**सदस्य जिल्हा निवड समिती तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद,गडचिरोली**

( शेखर शेलार)
**सदस्य सचिव जिल्हा निवड समिती**
**तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)**
**जिल्हा परिषद,गडचिरोली**

( विजय दोरखंडे )
**सदस्य जिल्हा निवड समिती**
**तथा कार्यकारी अभियंता (बांध)**
**जिल्हा परिषद,गडचिरोली**